अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :– संजय पांडुरंग गवस, वय :– ५४ वर्षे,

धंदा :– पोलीस पाटील व शेती, राहणार :– सासोली, ता. दोडामार्ग.

**सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु** –

दि.३०.०५.२०२३ रोजी मी पंचनाम्यासाठी दोडामार्ग पोलीस ठाणे येथे गेलो होतो. माझ्यासोबत सरपंच प्रवीण गवस होते. पंचनाम्यासाठी ज्या ठिकाणी गेलो होतो तेथे समीक्षा ठाकुर आणि पोलीस उपस्थित होते. पोलीसांनी समीक्षा ठाकुर यांची सर्वीस्तर माहिती सांगितली व वस्तू जप्त करायच्या आहेत असे सांगितले. पोलीसांनी पावती पुस्तक, स्टॅम्प, एक वही व लॅपटॉप समीक्षा ठाकुर यांच्याकडुन जप्त करायचे आहे, असे सांगितले. पहिल्यांदा पोलीसांनी पावती पुस्तक जप्त केले. ते पावती पुस्तक पांढऱ्या रंगाचे व गुलाबी रंगाचे होते. त्या पावती पुस्तकामध्ये ४७ पावत्यांच्या डुब्लीकेट प्रती होत्या. उर्वरीत ४८ ते १०० पावत्या मुळ व दुय्यम अशा शिल्लक होत्या. पहिल्या पावतीवर १७,०००/– रुपये रक्कम नमुद केली होती. तसेच शेवटच्या पावतीवर रु.१,००,०००/–रक्कम नमुद केली होती.

२) त्यानंतर एक सफेद रंगाचा प्लॅस्टीकचा रबरी स्टॅम्प दाखवला. त्या स्टॅम्पवर दिशा ग्रुप, सासोली, ता. दोडामार्ग असे लिहीले होते. त्यामध्ये एक सिंम्बॉल होता. त्यानंतर एकेरी वही दाखवली. त्या वहीमध्ये पाच पानांवर

कस्टमरची नावे व मोबाईल नंबर लिहीलेले होते. इंग्रजीमध्ये अमाउंट लिहीलेली होती. उर्वरीत ८० पर्यंत कोरी पाने होती. त्यानंतर ८१ ते ११८ पानांवर नावे लिहीलेली होती. त्यानंतर मला लॅपटॉप दाखविला. सदरचा लॅपटॉप काळ्या रंगाचा होता. त्या सर्व वस्तु पोलीस ठाण्यात जमा केल्या. त्या पंचनाम्यावर आमच्या व आरोपीच्या सह्या घेतल्या. सदरचा पंचनामा ११:१५ वाजता सुरु होऊन ०१:२० वाजता संपला. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यातील अ.क्र.१ वरील सही माझी आहे. सबब, त्यास **निशाणी क्र. P–6/PW6** देण्यात येत आहे. मी, जप्त केलेल्या वस्तु दाखविल्यास ओळखु शकतो. आता मला पावती पुस्तक दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यावरील लेबलवरील अ.क्र.१ वरील सही माझी आहे. सबब, त्यास MO–1 देण्यात येत आहे. (सदरचे पावती पुस्तक जप्त करताना तपासी अंमलदार यांनी त्यास लेबल लावल्याचे दिसते. पावती पुस्तक उघडण्यासाठी सदरचे लेबल मधुन फाडणे गरजेचे आहे. सबब, सरकारी वकील व आरोपीच्या विधिज्ञांसमक्ष सदरचे लेबल मधुन फाडण्यात आले.) आता मला ते पावती पुस्तक उघडुन दाखवले. सरतपासात सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये १ ते ४७ गुलाबी पावत्या आहेत व ४८ पासून पुढे सफेद व गुलाबी पावत्या आहेत.

३) आता मला रबरी शिक्का दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर दिशा ग्रुप, सासोली, दोडामार्ग असे लिहीलेले आहे. त्याच्या लेबलवर माझी अ.क्र.१ वर सही आहे. सबब, त्यास MO–2 देण्यात येत आहे. आता मला नोंदवही

दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावरील लेबलवरील अ.क्र.१ वरील सही माझी आहे. (सदरची वही जप्त करताना तपासी अंमलदार यांनी त्यास लेबल लावल्याचे दिसते. वही उघडण्यासाठी सदरचे लेबल मधुन फाडणे गरजेचे आहे. सबब, सरकारी वकील व आरोपीच्या विधिज्ञांसमक्ष सदरचे लेबल मधुन फाडण्यात आले.) सदरच्या वहीमध्ये पान क्र. १ ते ५ वर कस्टमरची नावे व नंबर लिहीलेली आहेत. वर सांगितल्याप्रमाणे वहीचा मजकुर तसाच आहे. सबब, त्यास **MO-3** देण्यात येत आहे. आता मला काळया रंगाचा लॅपटॉप दाखविण्यात आला. त्याच्या वरील लेबलवरील अ.क्र.१ वरील सही माझी आहे. सबब, त्यास **MO-4** देण्यात येत आहे. ज्या आरोपीच्या ताब्यातुन सदरच्या वस्तू जप्त केल्या होत्या, ती आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस्. ए. गवस यांचेकडून सुरु</u> –**

४) माझे गाव सासोली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोडामार्ग ते सासोली मधील अंतर साधारण ६-७ कि.मी. आहे. मला पंचनाम्यासाठी बोलवायला फोन आला होता. हे म्हणणे खरे नाही की, नेमका कोणाचा फोन आला होता, हे मी आज रोजी सांगू शकत नाही. मला साधारण १०:०० वा. सदरचा फोन आला होता. मी ११:०० वा. पोलीस ठाण्यात पोहचलो. आम्ही पोलीस स्टेशनला पोहचायच्या अगोदर ठाकुर साहेब पोलीस ठाण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही

की, आम्ही सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी पंचनामा लिहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तशाच्या तसा पंचनामा सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनामा जशाच्या तसा सांगू शकत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी शॉर्टमध्ये पंचनामा सांगितला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे पंचनाम्यामधील उर्वरीत बाबी पोलीसांनी सर्वीस्तर त्यांच्या मताने लिहील्या आहेत.

५) हे मला माहित नाही की, अशा प्रकारचे पावती पुस्तक दोडामार्गमध्ये कोणत्याही प्रिंटींगच्या दुकानात छापुन मिळतात किंवा कसे. मी पोलीस पाटील आहे व दोडामार्ग बाजारपेठेमध्ये मी फिरलो आहे. मी माझ्या आयुष्यात कधीच पावती बुक छापुन घेतलेले नाही. माझा आमच्या ग्रामपंचायतीसोबत संबंध येतो. आमच्या ग्रामपंचायतीमध्ये पावतीबुकं आहेत. सदरची पावती बुकं ग्रामपंचायत छापते का दुकानातुन घेतले जाते याबाबत मला माहित नाही.

६) जी वही मी पाहिली त्या प्रकारच्या वह्या बाजारात उपलब्ध असतात किंवा कसे हे मला माहित नाही. मी आठवी पर्यंत शिकलो आहे. मला एक मुलगा आहे व तो कामाला आहे. माझा मुलगा १५वी पर्यंत शिकलेला आहे. माझ्या मुलाने शाळेत असताना वह्या वापरल्या आहेत. त्याने ज्या वह्या वापरल्या त्या मी त्याला घरी बनवुन दिल्या नव्हत्या. पहिली पासून माझ्या मुलाच्या वह्या त्याची आई आणायची. त्यामुळे त्या वह्या कुठे मिळतात हे मला माहित नाही. त्याची आई वह्या कुठुन आणते याबाबत मी कधी चौकशी केली नाही. माझ्या शिक्षणादरम्यान माझे

काका मला वह्या आणुन द्यायचे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाच्या पदवी पर्यंतच्या शिक्षणात मी दुकानात गेलो व वही खरेदी केली, असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष जी वही जप्त केली, ती कोणत्या कंपनीची होती, हे मला आज रोजी सांगता येणार नाही.

७) माझा पोलीस पाटील म्हणुन स्टॅम्प आहे. तो स्टॅम्प मी घरी बनवलेला नाही. तो स्टॅम्प मी बाजारातून विकत घेतला आहे.

प्रश्न – अशा प्रकारचे स्टॅम्प बाजारात विकत मिळतात का ?

उत्तर – असे स्टॅम्प बनवुन ठेवलेले नसतात व लगेच मिळत नाहीत.

हे म्हणणे खरे आहे की, जर बनवायला सांगितले तर दुकानवाले अशाप्रकारचे स्टॅम्प बनवुन ठेवतात.

८) मला लॅपटॉप वापरता येत नाही. मला इंग्रजी लिहीता, वाचता व बोलता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेला लॅपटॉप कोणत्या कंपनीचा होता व त्याचा मॉडेल नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशा प्रकारचे लॅपटॉप बाजारात विकत मिळतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष जप्त केलेल्या त्याच वस्तू आज मला न्यायालयात दाखवल्या, असे दाखविणाऱ्या कोणत्याही विशेष खुणा त्या वस्तुंवर नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या केसचे स्वरुप व त्याचे फिर्यादी कोणत आहेत, हे मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या केसच्या कामी या वस्तु जप्त केल्या होत्या, हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, फ्रॉडच्या केसबाबत जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, नेमका कोणाचा फ्रॅाड झाला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, फ्रॉडच्या केसकामी या वस्तु जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे.

९) हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील असल्याने माझा पोलीसांशी वरचेवर संबंध असतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी योग्य आदेश केल्यावर मला पाळावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांसोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, चांगले संबंध असल्यामुळे आणि आमचे वरीष्ठ असल्यामुळे पोलीस सांगतील त्यापंचनाम्यावर मी सही करतो. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या पावतीबुकामध्ये कोणाकोणाची व किती नावे आहेत, हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, संपुर्ण वहीमध्ये काय काय लिहीलेले आहे, हे मी आज रोजी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ती संपुर्ण वही मी वाचली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या अपरोक्ष लिहून ठेवलेल्या पंचनाम्यावर त्यांच्या सांगण्यावरुन मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा करताना माझ्या समक्ष आरोपी उपस्थित होते असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस स्टेशनला गेलो तेव्हा या सर्व वस्तू साहेबांच्या टेबलवर होत्या. हे म्हणणे खरे आहे की, साहेबांनी टेबलवरच्या वस्तु माझ्या समक्ष आणल्या

नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, साहेबांनी सदरच्या वस्तु कुठुन आणल्या हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न – सदरच्या वस्तु साहेबांच्या टेबलवर होत्या, त्या त्यांनी तुमच्या समक्ष आणल्या नाहीत, आणि त्यामुळे त्या वस्तु तेथे कोठुन आल्या हे तुम्लाला सांगता येईल का ?

उत्तर – सदरच्या वस्तु माझ्या समक्ष आणल्या नसल्यामुळे त्या तेथे कोठुन आल्या हे मला सांगता येणार नाही.

१०) संपुर्ण पंचनाम्याच्या दरम्यान मी एकुण किती सह्या केल्या हे मला आज रोजी आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कुठे सह्या केल्या हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार सांगतो की, न्यायालयात दाखवलेल्या चारही वस्तुंच्या लेबलवर व पंचनाम्यावर सह्या केल्याचे त्याला आठवते. हे म्हणणे खरे नाही की, बऱ्याच लेबलवर पोलीसांनी माझ्या सह्या घेतल्या होत्या.

११) हे म्हणणे खरे नाही की, मी व दुसरे पंच पोलीस ठाण्यात जायच्या अगोदरच पोलीसांनी पंचनामा लिहुन ठेवला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या तयार पंचनाम्यावर मी सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असल्यामुळे केवळ पोलीसांना मदत करण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे

आहे की, अशा प्रकारच्या केसेसमध्ये मी पंच म्हणुन पंचनाम्यावर सह्या केल्या आहेत.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

ठिकाणः- दोडामार्ग. (आर. आर. भगत)
दिनांकः- ०९/०६/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग-१, दोडामार्ग.